# गोष्टीरूप गांधीजी
# व इतर

**साने गुरुजी**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B115

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**गोष्टीरूप गांधीजी व इतर : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये ३६०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# गोष्टीरूप गांधीजी

# साने गुरुजी आणि गांधीजी

गुरुजींचा आणि गांधीजींचा प्रत्यक्ष भेटीचा संबंध फक्त एकदाच आला होता. अमळनेरहून गांधीजी कोठेतरी जात होते. गुरुजींना बळजबरीने गांधीजींच्या डब्यात कोणीतरी लोटले. गुरुजींची शालीनता व संकोची स्वभाव. थोर पुरुषांच्या पासून ते दूर दूर असत आणि त्यांच्या कर्ममय मूर्ती दुरून पाहून स्फूर्ती घेत. महापुरुषांच्या जीवनातला एखादाही क्षण आपल्यासाठी विनाकारण खर्ची पडावा अशी त्यांना इच्छा नसे. त्या वेळी गांधीजी दोनच शब्द त्यांच्याशी बोलले. म्हणाले, ''श्रद्धा होना.'' गुरुजींना ती अमृतवाक्ये मिळाली. गुरुजींच्या जीवनाचा आधार असलेलीच गोष्ट गांधीजींनी उच्चारली, तेव्हा गुरुजी गांधीजींचे झाले तर नवल नाही.

गुरुजींच्या जीवनाला सर्व जगाशी एकरूप होण्याची तगमग होती, गरिबांच्यामधून ईश्वराचे दर्शन होणार, जन तोचि जनार्दन, अशी त्यांची भावना होती आणि गांधीजींच्या जीवनात सामान्य जनतेशी एकरूप होण्याची तळमळ पाहून गुरुजी गांधीजींच्याकडे आकर्षिले गेले. एक परार्धांश गांधी, एक परार्धांश रवींद्रनाथ टागोर आणि एक परार्धांश रामकृष्ण परमहंस बनणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय मानले होते.

गुरुजींच्या जीवनपुष्पाचा जो मंदमधुर मंगल सुवास महाराष्ट्रात सर्वत्र दरवळून राहिला आहे, त्याचे श्रेय गुरुजी कृतज्ञतेने ह्या थोरांना अर्पण करून मोकळे होत. त्यामुळेच गुरुजींच्याजवळ अहंकार नसे. गांधीजी हा गुरुजींच्या जीवनाचा सूर्य होता. हा सूर्य दूर तळपत असला, तरी त्यापासूनच उष्णता आणि प्रकाश मिळवून गुरुजी आपले जीवनपुष्प फुलवीत होते.

गुरुजींच्या वाङ्मयातही आपल्याला सर्वत्र गांधीविचारांचे दर्शन होते. महाराष्ट्राला गांधीजींची खरी ओळख करून देण्याचे श्रेय ज्या थोड्या व्यक्तींना आहे, त्यात गुरुजींचे स्थान फार वरचे आहे. मानवी मनाची उंच भरारी आणि मानवी मनाचा कमकुवतपणा ह्या दोन गोष्टींची जाणीव दोन दोघांच्या जीवनात विपुल होती कारण ते दोघे जन्मजात थोरपण घेऊन आलेले नव्हते. थोरपण स्वप्रयत्नाने मिळविणारे दोघेही जीवनवीर होते. गुरुजींचे वाङ्मय 'पत्री'पासून सुरू झाले. त्यांनी अखेर जे वाङ्मय लिहिले ते म्हणजे 'सुंदर पत्रे' किंवा 'विद्यार्थी' मासिकापासून त्यांनी जी साहित्यसेवा सुरू केली ती 'साधना' साप्ताहिकापर्यंत. ह्या सर्व साहित्यात गांधीजींचे सर्वत्र दर्शन होते.

गांधीजींना असे सदैव वाटे की, आपले काहीतरी जीवितकार्य आहे. साहित्य हा त्यांचा स्व धर्म कधीच नव्हता. तीच गोष्ट गुरुजींची. साहित्यसंमेलनातून गुरुजी जात नसत. कारण ते म्हणत की साहित्य हा काही माझा स्व धर्म नव्हे. मी लेखणीच्या लालित्यापेक्षा झाडूच्या लालित्याचा उपासक आहे. आज महाराष्ट्रात काही उदार विचारांचा प्रचार व्हावा अशी तळमळ वाटते म्हणून 'साधना' चालवतो. साहजिकच, लेखणीच्या लालित्यापेक्षा गुरुजींचे लक्ष आपण लेखणीच्याद्वारे कोणते विचार जनतेला देतो ह्याकडे असे आणि आपल्या लेखणीतून एकही शब्द निरुपयोगी जाऊ नये असे त्यांना वाटे. त्यामुळेच त्यांचे वाङ्मय प्रचारकी थाटाचे असल्याची साहित्यिकांची ओरड होती आणि ही गोष्ट गुरुजीही कधी नाकारीत नसत. जर उच्चारलेल्या शब्दाने काही संस्कार जनमानसावर उमटणारच असेल तर तो संस्कार सत् आहे की असत् आहे हे पाहणे त्यांना कर्तव्यरूप वाटे. त्यामुळे विस्तारभयाची गुरुजींनी कधी पर्वा केली नाही. विचारांचा संयम मात्र त्यांनी पाळला.

गांधीजींच्या १९३० पासूनच्या सर्व चळवळीत ते एक 'निष्ठावान सैनिक' म्हणून सामील झाले होते. तेही गांधीजींच्याप्रमाणेच 'संसारासी आग लावुनियां हातें । मागुतें पेटोतें पाहू नये ।' ह्याच गांधीजींच्या निष्ठेने. गांधीजींच्या विधायक कार्याचा त्यांनी सर्व प्रकारे प्रचार केला. खादीचे गठ्ठे खांद्यावर टाकून ते खानदेशात भटकले, तकली आणि चरखा त्यांनी सर्वत्र नेला. जातीय ऐक्याचा तर त्यांना ध्याय होता. सामाजिक विषमता नष्ट व्हावी म्हणून ते तळमळत. किसान कामगारांना चार घास सुखाचे मिळाले पाहिजेत म्हणून त्यांनी खानदेशात चळवळी केल्या. ३० सालच्या लढ्यात ते होते. ३२ साली पुन्हा तुरुंगात होते. ह्याच काळात गांधीजींचे सान्निध्य लाभलेल्या थोर पुरुषांचा सहवास त्यांना लाभला. स्वामी आनंद, प्यारेलाल वगैरे लोक नाशिक जेलमध्ये त्याच्याजवळ होते. विनोबाजी तर गुरुजींच्या जीवनात गुरुचे स्थान होते. १९४० च्या वेळी गुरुजी अगोदरच जेलमध्ये होते. १९४२ च्या आंदोलनात ते गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' ह्या संदेशाबरहुकूम भाग घेत होते. गुरुजींनी मंदिरप्रवेशाचा दौरा आरंभला, त्या वेळीही गांधीजींचे स्मरण गुरुजींना वारंवार होत असे. १९३२ साली गांधीजींनी हरिजनांसाठी उपास केला; पण समाजातून अजून अस्पृश्यता गेली नाही. गुरुजी त्या वेळच्या आपल्या भाषणात सांगत, 'तुमची, आमची हृदये ह्या कामात रंगावी अशी महात्माजींची उत्कट इच्छा होती. १० वर्षांत ही अस्पृश्यता जाईल अशी त्यांना आशा होती. दहाची पंधरा वर्षे झाली; पण आपल्याला काय दिसते आहे? गांधीजी काय म्हणतील? त्यांना आशा होती की स्वातंत्र्योन्मुख हिंदी राष्ट्र अस्पृश्यता झपाट्याने दूर करील. परंतु आपण उदासीन राहिलो. राष्ट्रपित्याची मान तुमच्या आमच्या उदासीनतेमुळे खाली व्हावी असे तुम्हास वाटते का? कशाला आपण 'महात्मा गांधी की जय' म्हणायचे? आपण कामचुकार ठरलो!' ह्याच भावनेने गुरुजी बेचैन झाले आणि गांधीजींचे कार्य करण्याच्या हेतूने त्यांनी पंढरपूरच्या मंदिर– प्रवेशाची महान यात्रा केली आणि नंतर उपवास केला. जनमनाचा कौल त्यांना हवा होता, हृदयमंदिरातही हरिजनांना प्रवेश मिळावा असे त्यांना वाटत होते. केवळ कायदे करण्याने हृदयमंदिरात प्रवेश होणार नाही, ही त्यांना खात्री होती. पण गुरुजींची ही तळमळ, ही थोरवी महाराष्ट्रातल्या तत्कालीन सत्ताधीशांना समजली नाही. गांधीजींचा गैरसमज झाला. त्यांना उपवास बंद करा म्हणून कळविले. परंतु गुरुजींचा निश्चय अभंग होता. 'सत्या असत्यासी मन केले ग्वाही' म्हणून त्यांनी उपवास चालूच ठेवला. नंतर गांधीजींना खरी परिस्थिती समजली. पंढरपूरचे मंदिरही उघडे झाले. गांधीजींनी दिल्लीच्या एका प्रार्थनाप्रवचनात गुरुजींचा उल्लेख करून त्यांना धन्यवाद दिले. ते ता. २५/११/४७ रोजी आपल्या प्रार्थनासभेतील भाषणात म्हणाले, 'दुसरी खुशीकी बात यह है की, पंढरपूरका पुराना और मशहूर मंदिर ठीक उन्ही शर्तोपर हरिजनोंके लिये खोल दिया गया है जैसा कि दूसरे हिंदुओंके लिये। इसका श्रेय साने गुरुजीको है, जिन्होने उसे हरिजनोंके लिये हमेशाके वास्ते खुलवानेके मकसदसे आमरण उपवास शुरू किया था।'

पुढे देशाचे स्वातंत्र्य आले, फाळणी झाली. देशातली जातीयता उफाळून वर आली. पुण्याच्या रस्त्यावर 'गांधी मरोत,' 'नेहरू मरोत' असे लिहिलेले गुरुजींनी पाहिले. गुरुजींना अत्यंत वेदना झाल्या. स्वातंत्र्याच्या बरोबर निर्माण झालेले जातीयतेचे विष ह्या नवस्वतंत्र्य राष्ट्राला बाधू नये म्हणून गांधीजी प्रयत्न करीत होते. आणि ३० जानेवारीला एका महाराष्ट्रीयनाने गांधीजींवर गोळ्या झाडल्या आणि त्यांची हत्या केली. गुरुजींचे हृदय शतश: विदीर्ण झाले. त्यांच्या प्रियतम महाराष्ट्रावर हा केवढा कलंक. जातीयतेचे विष जर महाराष्ट्रातून न जाईल तर महाराष्ट्रीयनांची स्थिती फार शोचनीय होईल. म्हणून गुरुजींनी महाराष्ट्रजीवनातली जातीयता जावी म्हणून हृदयशुद्धीसाठी २१ दिवसांचा उपवास केला आणि साऱ्या महाराष्ट्रभर जातीयताविरोधाची एक लाट उसळवून दिली.

राष्ट्रपिता गेला. पण रडून काय होणार? राष्ट्रपित्याने दाखेवलेल्या मार्गाने जाऊन त्याचे पुण्यस्मरण करायचे असते. गुरुजींनी ह्याच हेतूने 'कर्तव्य' नावाचे दैनिक सुरू केले. 'स्मरूनि हृदयी तूंते, कर्तव्य निज चालवू' हा शिरोलेख त्यांनी दैनिकावर घातला होता आणि त्यातूनच त्यांनी बापूजींच्या जीवनातील लहानसहान प्रसंगांतून त्यांच्या जीवनदृष्टीचे दर्शन घडविणाऱ्या छोट्या गोड गोष्टी लिहायला सुरुवात केली. गांधीजींचे चरित्र गाताना गुरुजींना कधी कंटाळा आला नाही, कधी पुरेसे वाटले नाही. गांधीचरित्रात ते रंगून जात. त्यांची तर इच्छा अशी होती की हरिविजय, रामविजय ह्यांच्याच धर्तीवर १०८ अध्यायांचा एक 'गांधीविजय' लिहायचा. ती वस्तू अपूर्व झाली असती. पण गुरुजी 'गांधीविजय' लिहू शकले नाहीत.

आपल्या आयुष्याच्या अखेरीस गुरुजींनी ज्या एका कामाचा ध्यास घेतला होता ते आंतरभारतीच्या स्थापनेचे कार्यही गांधीजींच्याच कार्यांपैकी एक होते, असे म्हटले तरी चालेल. गांधीजींना प्रांतीयता नको होती, जातीयता नको होती. जेथे-जेथे संकुचितता असेल तेथे-तेथे गांधीजींचा आत्मा कधीच रमला नाही. गुरुजींचेही तसेच होते. भारतीय आत्म्याची एकरूपता अनुभवण्याची, विविधतेत एकता पाहण्याची तळमळ अखेरीस गुरुजींना लागून राहिली होती.

शेवटी शुक्रवारी गुरुजींनी मृत्यूच्या मांडीवर निर्भयपणे आपले डोके ठेवल्याचे कळले, तेव्हाही साहजिकच त्याचाही संबंध गांधीजींच्या निर्वाणाशी लावल्यावाचून आम्ही राहू शकलो नाही. खादीच्या शुभ्र वस्त्रात त्यांनी आपला देह ठेवला होता. त्याच कपड्यात त्यांची उत्तरक्रिया करावी अशी त्यांची इच्छा होती. आपली देहयात्रा गांधीजींनी देहयात्रा संपविली त्याच वेळेस संपावी अशाच कयासाने त्यांनी चिरनिद्रेची तयारी केली असावी, असे सहजी आमच्या मनात आले.

गुरुजी आणि गांधीजी दोघेही भावनेच्या चाऱ्यावर जगत होते. दोघांच्या जीवनात ईश्वराला आणि उपवासाला फार मोठे स्थान होते. ह्याचमुळे दोघांनाही लोक समजू शकले नाहीत. गांधीजींनी आगाखान महालात उपवास केला तेव्हा निलिथगो त्याला पोलिटिकल ब्लॅकमेलिंग म्हणाला. महाराष्ट्रातल्याही सुजाण समजल्या जाणाऱ्यांना गुरुजींचा उपासाचा अर्थ अशाच प्रकारे समजला नाही. काही गोष्टींना गुरुजींच्या जीवनात असे स्थान होते की, त्यांच्याशिवाय जगणे त्यांना मृत्यूपेक्षा भयंकर वाटायचे! तसा तर मृत्यू त्यांना कधीच भयंकर वाटला नाही. रात्री मनुष्य निद्रेच्या अधीन जितक्या सहज होतो, तितक्याच सहज दोघांनी मृत्यूला कवटाळले. गांधीजींनी मरताना 'हे राम' म्हटले आणि गुरुजींनी अखेरच्या पत्रात लिहिले, 'बहुधा देवाघरचे बोलावणे मला आहे.' ही ईश्वरश्रद्धा सामान्य व्यवहारी लोकांना समजत नसली तरी त्यावरच ह्या दोन थोर पुरुषांची जीवने आधारलेली होती, असे वाटते.

गांधीजींच्या जीवनाशी अशा प्रकारे विविध स्वरूपांत गुरुजींचा संबंध होता. त्यांनी १९४३ पर्यंत गांधीजींच्या जीवनाचे चिंतन 'गोष्टीरूप गांधीजी'मध्ये करून ठेवले होते. हे चरित्र पुन्हा सुधारून देण्याची त्यांची इच्छा होती; परंतु ते तसे करू शकले नाहीत. नाहीतर ह्या चरित्रात किती अपूर्वता त्यांनी आणली असती ! गांधीजींनी आपल्या चरित्रग्रंथाचे अखेरचे तेजस्वी पान लिहिले तेथपर्यंत पुस्तक पूर्ण करणे तर आवश्यक होते आणि म्हणून हे चरित्र पूर्ण करण्याचे मी पत्करले. एखाद्या उंची रेशमी वस्त्राला हलक्या कापडाचा जोड द्यावा, तसे हे होणार आहे. पण वाचकांनी गोड करून घ्यावे.

**-यदुनाथ थत्ते**

# अनुक्रमणिका


- गोष्टीरूप गांधीजी ..................... १३
- बापूजींच्या गोड गोष्टी ..................... १६९
- महात्मा गांधींचे दर्शन ..................... २६७


✦✦✦

# गोष्टीरूप गांधीजी

सेवादलातील प्रिय सैनिकांनो,

आज तुम्हाला कोणाच्या गोष्टी सांगणार आहे ते माहीत आहे का? त्या महापुरुषाचे स्मरण होताच हृदय भक्तिप्रेमाने भरून येते. त्या थोर विभूतीचे ह्या भारत देशावर अपार उपकार आहेत. ही विभूती केवळ ह्या देशाचीच आता राहिली नाही. ती जगाची झाली आहे. ह्या महापुरुषाला मी संत म्हणू की संसारी म्हणू ? मुनि म्हणू की मुत्सद्दी म्हणू? संन्यासी म्हणू की रात्रंदिवस सेवेत रमलेला कर्मयोगी म्हणू? वीरपुरुष म्हणू की शांतात्मा म्हणू ? कोणत्या शब्दांनी मी वर्णन करू ? नवभारताला त्यांनी जन्म दिला आहे. नवीन सृष्टी ते निर्मू पाहात आहेत. रणगाडे, बाँब ह्यांच्या जगड्व्याळ रणधुमाळीत अहिंसा व प्रेम ह्यांचा संदेश ते सांगत आहेत. मित्रांनो, अशी अलौकिक विभूती अनेक शतकांत एखादीच जन्माला येते.

तुम्ही ओळखलेच असेल की मी महात्माजींच्या गोष्टी सांगणार आहे. होय, त्यांच्याच पुण्यकथा आज मी सांगणार आहे. आज कदाचित संपणार नाहीत; उद्या रात्री बसू; उद्याही संपल्या नाहीत तर परवा बसू. महात्माजींचे जीवन सागराप्रमाणे आहे. हजारो प्रसंग. मी सांगणार तरी किती ? परंतु दोन–तीन दिवसांत जेवढे सांगता येतील तेवढे सांगेन.

**जन्म व आईबाप**

महात्माजींचा जन्म कोठे झाला माहीत आहे ? तुम्ही म्हणाल, ''गुजराथमध्ये.'' परंतु गुजराथमध्ये म्हणजे कोठे ? ज्या नगरीत भक्त सुदामदेव नांदत होता, त्याच नगरीत महात्माजींचा जन्म झाला. हल्ली ज्याला पोरबंदर म्हणतात, त्याला पूर्वी सुदामपुरी म्हणत. काठेवाडमधील हे गाव. ज्या काठेवाडात अहिंसा धर्म शिकविणाऱ्या जैन धर्माची पुण्यक्षेत्रे आहेत, ज्या काठेवाडात गोपालकृष्णाची पवित्र द्वारका आहे, ज्या काठेवाडात सोमनाथांचे